कार्यालय पोलीस निरीक्षक, पोलीसठाणे दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर
ई-मेल :-ps.daulatabad,abad@mahapolice.gov.in
फोन नंबर- 0240-2615651

दौलताबाद , पोलीस स्टेशन, छ.संभाजीनगर दि. 13/09/2024

# प्रेसनोट

## दौलताबाद पोलीसांच्या सतर्कतेमुळे ATM फोडीचा/सोन्याचे दुकानात चोरीचा प्रयत्न फसला. आरोपीचे ताब्यातुन चोरीची मोटार सायकल, धारदार शस्त्र, 05 कि.ऑक्सीजन सिलेंडर, 02 किं.गॅस टाकी व इतर साहित्य जप्त.

दिनांक 07/09/2024 पासुन सुरु झालेल्या श्री गणेश उत्सव निमित्ताने पोलीस स्टेशन हद्दीत पोस्टे दौलताबाद चे डी.बी. पथकाचे पोउपनि/ वसंत शेळके, पोअं/ खुशाल पाटील, पोअं/दिपक मतलबे, पोअं/ ज्ञानेश्वर कोळी असे रात्री पेट्रोलींग करत असताना अब्दीमंडी ते दौलताबाद टी पॉईंट दरम्यान मिलन मिठाईचे समोरील रस्त्यावर मोटार सायकलच्या लाईटच्या उजेडात 22.45 वा. दरम्यान एक विना नंबरची मोटार सायकल दिसुन आली. पोअं/ ज्ञानेश्वर कोळी व पोअं/ खुशाल पाटील यांनी त्यास जवळ जावुन वाहन थांबवण्याचा इशारा केला . परंतु त्यांनी त्यांची मोटार सायकल वेगाने पळवण्याचा प्रयत्न केला असता पथकाने त्यांचे समोर जावुन त्यांची मोटार सायकल थांबवुन विचारपुस करीत असताना आरोपीने त्याचे पाठीवर असलेली बॅग खाली ठेवुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला. पोअं/ ज्ञानेश्वर कोळी व पोअं/ खुशाल पाटील यांनी अंदाजे 300 मीटर अंधारात झाडाझुडपातुन आरोपीचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले.

सदर ठिकाणी अंधार असल्यामुळे आरोपीस सुरक्षेच्या कारणास्तव पोलीस स्टेशन दौलताबाद येथे आणुन विचारपुस केली असता त्याने त्याचे नांव - सोमनाथ शिवाजी भुतांबरे, वय 25 वर्ष, धंदा- मजुरी, रा. समशेरपुर, चिंचाची वाडी , ता. अकोले जि. अहमदनगर असे सांगुन, त्याचे जवळ मिळुन आलेली मोटार सायकल जुन्नर जि. पुणे येथुन चोरी केल्याचे सांगितले.

आरोपीचे बॅग व मोटार सायकल वरील गोनीची दोन पंचासमक्ष झडती घेतली असता त्यात 05 कि.ऑक्सीजन सिलेंडर, 02 किं.गॅस टाकी, धारदार शस्त्र , कटर, पक्कड, पाना इत्यादि साहित्य मिळुन आले. आरोपीस ते जवळ बाळगण्याचे कारण विचारले असता आरोपीने उडवाउडवीची उत्तरं दिली. आरोपी विरोधात पोस्टे दौलताबाद गुरनं. 181/2024 कलम 4/25 भा.ह.का. सहकलम - 122 म.पो.अं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्रेपोउपनि/ शेख सलीम हे करीत आहेत.

आरोपीचा गुन्हयाचा अभिलेख तपासला असता त्याचे विरोधात पोस्टे- अकोले,जि. अहमदनगर येथे आठ (08) चोरीचे गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपीस पोस्टे – जुन्नर, जि. पुणे येथील एका मंदीरात चोरी प्रकरणात सन-2023 मध्ये अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, श्री. प्रविण पवार साहेब, मा.पोलीस उपआयुक्त (परि-01) श्री नितीन बघाटे साहेब, मा. सपोआ छावणी विभाग श्री महेंद्र देशमुख साहेब व मा.पो.नि. श्रीमती रेखा लोंढे यांचे मार्गदर्शना खाली पोउपनि/ वसंत शेळके, पोअं/खुशाल पाटील, दिपक मतलबे, ज्ञानेश्वर कोळी , सुनिल,घुसिंगे यांनी पार पाडली.